

# माणिक मोती

## माणिक वर्मा आणि परिवार

शोभा बोंद्रे

राजहंस प्रकाशन

*माणिक वर्मा*
*अलौकिक कलाकार अन् अलौकिक व्यक्तिमत्त्व!*
*त्यांच्या सुंदर सुरेल स्मृती जपण्यासाठी*
*ही शब्दफुलांची ओंजळ...*



# मनोगत

सुप्रसिद्ध आणि विलक्षण लोकप्रिय गायिका माणिक वर्मा ह्यांच्या हजारो, लाखो चाहत्यांपैकी मी एक. वर्षानुवर्षं त्यांचं गाणं ऐकताना एक गोष्ट मला नेहमीच जाणवली, ती म्हणजे त्यांच्या गाण्यांमधली विविधता.

अतिशय तरुण वयातच अखिल भारतीय कीर्तीच्या शास्त्रीय संगीत गायिका म्हणून त्या नावारूपाला आल्या. पण त्याच वेळी त्यांच्या भावगीतांनी महाराष्ट्राला वेड लावलं, त्यांच्या भक्तिगीतांनी श्रोते नादब्रह्माशी एकरूप झाले, त्यांच्या नाट्यसंगीताला रसिकांची भरभरून दाद मिळाली आणि 'जाळीमंदी पिकली करवंदं'सारखी त्यांची एखादीच लावणीही ज्याच्या त्याच्या मनात ठसली.

माणिकबाईंनी साधना केली ती सप्तसुरांची. त्यातून उमटलेलं कुठचंही गाणं त्यांच्या लेखी कमी-जास्त दर्जाचं नव्हतं आणि वर्ज्य नव्हतं.

शास्त्रीय संगीताच्या बाबतीतही त्यांच्या मनात हाच मोकळा भाव आणि हीच सर्वसमावेशक वृत्ती.

म्हणूनच किराणा घराण्याची तालीम घेऊन माणिकबाईंच्या गाण्याची सुरुवात झाली असली, तरी घराणेशाहीत अडकून न पडता, श्रोत्यांना ऐकविण्यासाठी आपल्याकडे गाण्याचा अधिकाधिक समृद्ध खजिना कसा तयार होईल, इकडे त्यांचं सतत लक्ष असायचं.

ह्या शोधयात्रेत किराणा घराण्याच्या स्वरप्रधान गायकीबरोबर त्यांनी बनारस आणि आग्रा घराण्याचा वारसाही अलगद एकत्र करून जपला. आग्रा घराण्याच्या बंदिशी असोत वा जयपूर घराण्याचा तान-पलटा, त्यांच्या गाण्यात घराण्यांचं वेगळेपण जसं काही एकच होऊन गेलं.

कलाकार म्हणून माणिकबाई फार मोठ्या होत्या, पण विशेष म्हणजे 'माणूस' म्हणूनही त्या तेवढ्याच मोठ्या होत्या. अतिशय साधं सरळ व्यक्तिमत्त्व. जितकं लोभस, गोड आणि सुंदर दिसणं, तितकंच सुंदर मन आणि वागणं.

त्यांच्या मुली, शिष्या, सख्ख्या शेजारणी अशा अनेकांशी बोलल्यानंतर 'उत्तम माणूस' ही माणिकबाईंची खरी ओळख मला पटली, भावली आणि मनाला भिडली.

अर्थातच सुरू झाला पुस्तकप्रपंच.

पुस्तकाची मांडणी करताना एका गोष्टीचं भान ठेवावं लागलं, ती म्हणजे माणिकबाईंवर पुस्तक लिहिताना त्यांच्या सर्व कुटुंबाला त्यात सामावून घ्यायला हवं. श्री. अमरजी वर्मा, भारती, वंदना, राणी अशा सर्वांनी वेगवेगळ्या कलाक्षेत्रात भरीव कामगिरी केली आहे, मोठं नाव कमावलं आहे. अरुणा कलेच्या प्रांतात शिरली नाही, पण वैद्यकीय जगात तिनं जीव ओतून काम केलं आणि स्वत:ची ओळख निर्माण केली.

एका अत्यंत मोठ्या कलाकाराच्या घरात प्रत्येकाने आपली स्वतंत्र वाट निवडून स्वत:चा ठसा उमटवावा, हे फार कौतुकास्पद आणि वेगळं चित्र आहे.

म्हणूनच पुस्तकाचं नाव ठरवलं,

'माणिक मोती,

माणिक वर्मा आणि परिवार.'

ह्याशिवाय हे पुस्तक लिहिण्यासाठी मला भरभक्कम आधार आणि वरदान मिळाले, ते म्हणजे राणी वर्मा हिने तयार केलेली 'माणिक वर्मा प्रतिष्ठान'ची वेबसाईट - www.manikvarma.com

या वेबसाईटवर उपलब्ध असलेली माहिती म्हणजे एक अनमोल खजिनाच.

अत्यंत काळजीपूर्वक, प्रेमाने आणि अपार कष्ट घेऊन राणीने आपल्या आदरणीय 'मम्मी' विषयीची सर्व माहिती दृकश्राव्य सादरीकरणे, छायाचित्रे व छापील मजकुराच्या स्वरूपात अत्यंत सुंदर रितीने पेश केली आहे.

'माणिक मोती' या पुस्तकातही तंत्रज्ञानाच्या QR Code Scanningच्या साहाय्याने तिने माणिकबाईंचा आवाज, फोटो, मान्यवरांचे लेख आणि मनोगते दृकश्राव्य पद्धतीने सादर केले आहेत. तो सारा तपशील पाहायला आणि ऐकायलाही मिळतो, हे सारे श्रेय आणि कौतुक राणीचेच!

'माणिक मोती' हे पुस्तक करताना मला जो आनंद मिळाला, तो अनुभव वाचकांना आणि माणिकबाईंवर एक व्यक्ती, कलाकार म्हणून मनापासून आदर-प्रेम करणाऱ्या असंख्य रसिकांनाही मिळेल, अशी खात्री बाळगते.

**शोभा बोंद्रे**




## अष्टपदी


एक सप्तसूर माझे सखेसोबती / १
दोन घरगृहस्थी / १८
तीन कलाकारी / २८
चार पुण्यातला बाळगोपाळ मेळा / ३५
पाच स्वप्ननगरी – मुंबापुरी / ५३
सहा पुनर्जन्म / ८३
सात नवी पहाट / ९६
आठ उत्तररंग / १६८

## मानवंदना

'गुणीजन' माणिक / १८९
सच्ची, सात्त्विक, निर्मळ माणिकताई!
तसाच तिचा सूर! / १९६
बहुआयामी माणिकताई / १९९
विदुषी माणिक वर्मा यांचे खयालगायन / २०१
घराण्यांच्या गायकीतील सौंदर्याचा वेध
घेणारी कलावती : माणिक वर्मा / २०४
भारतीय अभिजात संगीतातील माणिक :
माणिक वर्मा / २०६
मान्यवरांचे गौरवोद्गार / २०८



# माणिक मोती
## माणिक वर्मा आणि परिवार



एक

# सप्तसूर माझे सखेसोबती

**माणिक वर्मा**

अगदी लहानपणच्या ज्या काही सुंदर आठवणींची चित्रं डोळ्यांसमोर येतात, त्या बहुतेक चित्रांमध्ये, पुण्याच्या आमच्या घरात माई (माझी आई) हिराबाई दादरकर तंबोरा घेऊन गाण्याचा रियाज करते आहे आणि मी तिच्या आजूबाजूला लुडबुड करते आहे, घोटाळते आहे, असं मला दिसतं.

कधी बापूराव केतकर, तर कधी बशीरखाँसाहेब, तर कधी बागलकोटकरबुवा तिला शिकवत असायचे. वेळोवेळी काळानुसार गुरू बदलले, पण चित्रातलं माझं तिच्याभोवती असणं कायम राहिलं.

तेव्हा मला गाणं कळत नव्हतं. मात्र माई गायची, ते ऐकायला आणि तिला बघायलाही मला फार आवडायचं. कुठेतरी ते गाणं माझ्या मनात नकळत झिरपतही असणार. कारण माई एखादी ओळ विसरली, तर मी पटकन ती ओळ म्हणून दाखवायची.

---

*मुलाखत : माणिक वर्मा  मुलाखतकार : शैला दातार*
*विषय : आईसोबत बालपण*
*पुणे आकाशवाणीच्या सौजन्याने.*

---

मी सात वर्षांची होते, तेव्हा माझी गाण्याची शिकवणी सुरू झाली ती ‘भारत गायन समाज’मध्ये. माझे पहिले गुरू म्हणजे अप्पा भोपे. पं. भास्करबुवा बखले, मास्टर कृष्णराव अशा नामवंतांची ही संस्था. त्यांनी मला काही द्रुत खयाल, छोटी छोटी नाट्यगीतं, ‘सनातन नाद हा, भगवाना’ असं मला म्हणता

येईलसं सोपं गाणं शिकवलं. ते माझ्याकडून चांगलं घोटूनही घेतलं.

मी माईला गाणं म्हणून दाखवायची. पण एखादी तान विसरले, की पुढच्या सर्व ताना चुकायच्या किंवा एखादा चुकीचा आलाप घेतला, की पुढे सर्वच चुकायचं.

ती विचारायची, ''अगं, असं पाठ केल्यासारखं, बसवल्यासारखं काय गातेस?''

मी म्हणायची, ''मला गुरुजींनी असंच शिकवलं आहे.''

तिला गाण्याचं उत्तम ज्ञान असल्यामुळे ती मला समजवायची, ''हे बघ, चार आलाप, चार ताना असं मोजूनमापून गायचं नसतं. आता हे बघ, तुला शिकविलेलं हे गाणं.''

इथे ती गाणं स्वत: म्हणून दाखवायची आणि विचारायची,

''ऐकलंस का नीट? हा गंधार, हा मध्यम. प्रत्येक स्वर नीट लक्षात ठेवून गा. पण त्याचबरोबर म,रे,ग,- ग,रे,म अशी काही कॉंबिनेशन कर. स्वत:च्या मनानं बढत कर. शिकविलेल्या पोपटासारखी पोपटपंची करू नको.''

माईची फार इच्छा होती की, आपल्या मुलीनं केसरबाई केरकर, हिराबाई बडोदेकर ह्यांच्यासारखी नामवंत गायिका व्हावं.

''असा मान आणि आदर कमवायचा असेल, तर अशीच मोठी मेहनतही करायला हवी. त्यासाठी तू स्वत:च्या मनानं विचार करायला शीक.''

त्या वयात तिचे हे विचार आणि मोठे मोठे शब्द माझ्या डोक्यावरूनच जायचे. मी मान डोलवायची, पण मनात विचार यायचा, 'म्हणजे मी नक्की काय करायचं?'

---

*मुलाखत : माणिक वर्मा । मुलाखतकार : शैला दातार*
*विषय : संगीत शिक्षण – भोपे गुरुजी आणि माई*
*पुणे आकाशवाणीच्या सौजन्याने.*

---

मी दहा-अकरा वर्षांची असेन. तेव्हा 'ध्रुव कुमार' हा सिनेमा आला आणि मग त्यातल्या एका गाण्याची स्पर्धा जाहीर झाली. बारा वर्षांच्या आतल्या मुलांसाठी.

त्या सिनेमातली भैरवी गायची होती.

माईकडे त्या वेळी जोशीबुवा नावाचे एक तबलजी यायचे. ते माईला म्हणाले, ''माणिकनं स्पर्धेत भाग घ्यायला हवा.''



लहानपणची माणिक

माई म्हणाली, ''तिला काय येतंय?'' पण ह्या स्पर्धेत भाग घ्यायचा, असं मी ठरवलं.

तेव्हा ह्या गाण्याची रेकॉर्ड आली नव्हती. मग मी तो सिनेमा आठ वेळा पाहिला. पहिल्यांदा पाहायला गेले, तेव्हा थिएटरबाहेर गाण्यांचं पुस्तक मिळत होतं, ते विकत घेतलं आणि प्रत्येक वेळी सिनेमा बघताना गाण्याची एक ओळ नीट ऐकून लक्षात ठेवली.

ह्या स्पर्धेत माझा पहिला नंबर आला आणि बक्षीस म्हणून मला हार्मोनियम मिळाली.

तेव्हा माईला वाटलं, 'सिनेमा पाहून, प्रत्येक वेळी फक्त एक ओळ लक्षात ठेवून हिनं आपली आपणच चाल बसवली. ह्याचा अर्थ हिला गाण्यात गम्य आहे.'

ह्या स्पर्धेचा निकाल पुण्याच्या पेपरमध्ये छापून आला. त्यामुळे लोकांनी खूप कौतुक केलं आणि पुण्यात माझं नाव झालं.

त्या काळात एचएमव्ही कंपनीचे लोक चांगले गाणारे कोण आहेत, त्यांचा शोध घेत गावोगावी फिरायचे. तसेच ते पुण्यात आले असताना त्यांना कोणीतरी माझं नाव सुचवलं, ''माणिक दादरकर नावाची मुलगी आहे, ती छान गाते.''

लागायचं. माझ्या मनात यायचं, स्त्री कलाकारांना आपली कला आणि घर-संसार सांभाळताना किती तारेवरची कसरत करावी लागते? पण हा तोल सांभाळून आज माणिकनं लखलखीत यश मिळविलं आहे, ह्यासाठी तिचं खूप कौतुकही वाटायचं.

त्यानंतर पुढे काही वर्षांनी, आकाशवाणीसाठी 'अंगणी गुलमोहर फुलला,' हे गाणं मी तिच्याकडून बसवून घेतलं. गाणं मनापासून शिकण्याची, ते उत्कृष्ट रितीनं सादर करण्याची तिची मूळ वृत्ती तेव्हाही बदलली नव्हती.

## माणिक वर्मा

अशी बरीच वर्षं गेली. एका बाजूला संसाराची वेल छान बहरली होती. घरातल्या सर्वांचा पाठिंबा आणि आधार असल्यामुळे माझे गाण्यांचे कार्यक्रम सतत चालू होते. भरपूर तऱ्हेच्या गाण्यांच्या रेकॉर्ड निघत होत्या, भावगीतं, भक्तिगीतं, चित्रपटगीतं, शास्त्रीय संगीत वगैरे वगैरे. मराठीतली पहिली गझल रेकॉर्ड करण्याची संधी मला मिळाली. 'सांग कशी गं' आणि 'त्या चित्त चोरट्याला.' कविवर्य राजा बढे ह्यांच्या भावपूर्ण शब्दांना मधुकर गोळवलकर ह्यांनी पंजाबी ठेक्यावरची किती अनुरूप चाल दिली आहे? 'देव पावला' ह्या चित्रपटासाठी प्रथमच मी पु. ल. देशपांडे ह्यांच्या संगीतदिग्दर्शनाखाली गायले.

पु. ल. देशपांडे आणि माणिक वर्मा





अरुणा, माणिकताई आणि मैत्रिणी - रंजू, पद्मजा

दोघीही कला क्षेत्रात चमकायला लागल्या. ह्या काळात मम्मी अखिल भारतीय संगीत क्षेत्रातली अत्यंत नावाजलेली आणि विलक्षण लोकप्रिय कलाकार होती. अशी कलाकार की जिने आपल्या अष्टपैलू संगीतानं असंख्य कानसेनांना श्रवणानंद दिला आणि त्याच वेळी आपल्या सहज सुंदर वागण्याबोलण्यानं, गोड व्यक्तिमत्त्वानं आणि नम्र ऋजू स्वभावानं समाजाचा 'आपलेपणा' मिळविला. असं म्हटलं जायचं, की मुलीला दाखविण्याचा कार्यक्रम असेल, तर त्या मुलीला 'माणिक वर्मा' ह्यांचं एखादं गाणं शिकविलं जायचं. कारण 'माणिक वर्मा म्हणजे सात्त्विक, सोज्ज्वळ आणि सुंदर,' असं एक समीकरण तयार झालं होतं.

साठ ते सत्तर ह्या दशकात पपांनीही सरकारी चौकटीत राहून त्यांच्या आवडीचं खूप चांगलं काम केलं. 'P.M. Shastri's visit to Burma, Vacation time, Contribution towards Defence Efforts Burning Coal,' अशा विविध विषयांवरचे सरकारी माहितीपट त्यांनी बनवले. प्रख्यात नृत्य कलावती सितारादेवी हिच्यावर त्यांनी बनविलेल्या माहितीपटाचीही खूप प्रशंसा झाली.



मालती माजगावकर आणि उषा दादरकर

मी आणि माझी मोठी बहीण उषा आम्ही दोघीही दादरकर ह्यांच्या पुण्याच्या एकत्र कुटुंबातल्या सुना. चंद्रकांतदादांशी लग्न होऊन आधी उषा दादरकरांच्या घरात आली. नंतर त्यांच्या मामेभावाशी म्हणजे दत्ता माजगावकर ह्यांच्याशी माझं लग्न झालं. चंद्रकांतदादांना सर्व म्हणायचे 'अण्णा' आणि आमच्या 'ह्यांना' म्हणायचे 'दत्तामामा'.

तसं पाहिलं, तर उषा ही माणिकताईंची सख्खी वहिनी आणि मी मामेभावाची बायको. पण दादरकर ह्यांच्या घरात इतका एकोपा होता की, तिथे सगळेच सख्खे आणि सगळेच आपले. आमचे 'हे' दादरकरांच्या पुण्यातल्या कुटुंबात राहिलेले, वाढलेले. आर्मीमध्ये नोकरी असल्याने त्यांच्या सारख्या बदल्या व्हायच्या. कधी कुटुंबासाठी राहण्याची जागा असायची, तर कधी नसायची. त्यामुळे मी आणि पुढे माझ्या मुलीही येऊन जाऊन राहत होतो, ते पुण्यात दादरकरांच्या घरात.

मी लग्न होऊन आले, तेव्हा ताई अखिल भारतीय कीर्तीच्या, विलक्षण लोकप्रिय अशा गायिका होत्या. पपाही फिल्म्स डिव्हिजनमध्ये चांगली नोकरी करत होते. ते दोघे मुंबईला भाड्याच्या घरात राहात होते. त्यावेळी भारती, अरुणा आणि दीड वर्षांची वंदना ह्या त्यांच्या तिघी मुली पुण्याला होत्या.

## आठ
# उत्तररंग

**शैला दातार**

बालगंधर्वांनंतर कोणा गायकावर महाराष्ट्रानं भरभरून प्रेम केलं असेल, तर ते माणिक वर्मांवर.

एका अत्यंत अवघड दुखण्यातून त्या बऱ्या झाल्या हेच विशेष. पण संगीत रसिकांचं भाग्य म्हणजे त्या परत पूर्वीसारखं गायलाही लागल्या. पाच वर्षांच्या प्रदीर्घ कालावधीनंतर तुळशीबागेत त्या गायल्या. तिथून त्यांची संगीताची कारकीर्द परत एकदा नव्यानं सुरू झाली. मला आठवते, ती नंतरच्या काळातली सवाई गंधर्व महोत्सवातली त्यांची मैफील. तुडुंब गर्दी जमली होती. माणिकबाईंच्या सुरांनी श्रोतृवर्गावर मोहिनी घातली होती आणि मग राग 'जोगकंस' त्या अशा काही जमून गायल्या, की ती संध्याकाळ अविस्मरणीय ठरली.

१९८० साली मला गाणं शिकण्यासाठी महाराष्ट्र राज्याची स्कॉलरशिप मिळाली. मी पं. वसंतराव देशपांडेंना भेटले. ते म्हणाले, ''मी तुला नाट्यसंगीत शिकवीन. पण शास्त्रीय संगीतासाठी तू माणिक वर्मांकडे जा. बाईने बाईकडेच शिकावं. माणिक फार प्रेमळ आहे. ती तुला चांगलं शिकवेल.'' ते केवळ सूचना देऊन थांबले नाहीत, तर महाराष्ट्र सरकारला त्यांनी तसं पत्रही लिहिलं.

मग सुरू झाली माझी माणिकबाईंकडची शागिर्दी. मी डेक्कनक्वीनचा पास काढला आणि बाईंकडे सकाळी अकरा वाजता पोचले. शिकवणीचा पहिलाच दिवस. बाईंनी विचारलं, ''काय गं, शैला, आज तुला सकाळी लवकर निघावं लागलं असेल आणि रात्री घरी पोचायलाही उशीर होईल. मग स्वयंपाक कोण, सुधीर करणार का?'' मी सांगितलं, ''नाही बाई. मी स्वयंपाक करूनच आले आहे.'' त्या हसल्या आणि म्हणाल्या, ''घर सांभाळून गाणं केलंस, तर तुला



शिष्या - शैला दातार, माणिकताई

खरं समाधान मिळेल. मीही तेच केलं.''

माणिकबाई मला शिकवायला लागल्या. तेव्हा शिष्य म्हणून नवनवीन राग, त्यातल्या बंदिशी, त्या रागांचं सादरीकरण ह्या गोष्टी मी शिकत गेले. पण विशेष म्हणजे बाईंचं गाणं आणि गाण्यासंबंधी बोलणं जवळून ऐकताना, बाईंच्या अद्वितीय गाण्याचं मर्म मला समजून घेता आलं.

त्यांचा आवाज, उत्कृष्ट स्मरणशक्ती आणि ग्रहणशक्ती ही दैवी देणगी होती. पण त्याला कमालीच्या मेहनतीची जोड मिळाल्यानं, त्यांचं गाणं विलक्षण प्रभावी आणि श्रवणीय व्हायचं.

कार्यक्रम कुठेही असो, प्रत्येक वेळी श्रोत्यांना काहीतरी नवीन ऐकायला मिळावं, अशी त्यांची इच्छा असायची. मग त्या वेगवेगळ्या कल्पना शोधायच्या आणि त्यासाठी वेगळा रियाजही करायच्या.

त्या म्हणायच्या, ''अध्यात्मात जसं नामस्मरण, तसाच संगीतात रियाज. ही गुरुमुखी विद्या आहे. शाळा-कॉलेजमध्ये अभ्यास केल्यासारखी ती वर्षानुवर्षं शिकावी लागते. इथे कुठचाही शॉर्टकट चालत नाही.''

प्रत्यक्ष मैफिलीतल्या गाण्यासंबंधी त्यांचं मत असं होतं की 'लहान मुलाला प्रेमानं आंजारावं, गोंजारावं, तसं प्रेमानं गावं. खडे स्वर लावू नयेत. पुरुषांच्या गाण्यात आक्रमता असते. ती त्यांना शोभते. पण बाईच्या गाण्यात गोडवा हवाच. मैफील ऐकून श्रोता खूश होतो आणि श्रोत्यांना खूश राखणं, हेच